# ओएनजीसी (डब्ल्यूओयू) कर्मचारी संघटना

<u>मान्यताप्राप्त युनियन</u>

बंधू भगिनींनो,

आज दि. १७ मे २०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता डेप्युटी चिफ लेबर कमिशनर, मुंबई यांचे कार्यालयात मान्यताप्राप्त युनियनच्या निवडणूकीसाठी मिटींग बोलावण्यात आली होती. सदर मिटींगमध्ये आपल्या युनियनव्यतिरीक्त इतर तीन युनियन्सही सहभागी झाल्या होत्या. सदर मिटींगमध्ये दि. १४ जून ते २८ जून २०१८ या कालावधीमध्ये निवडणूक घेण्यासाठी एकमत झाले व दि. २९ जून रोजी मतमोजणी करण्याचे निश्चीत करण्यात आले.

मतमोजणी करतेवेळी इतर तीन युनियन्सनी हाजीरा व उरण येथिल मतपेट्यांची मोजणी वेगळी करण्यात यावी असा आग्रह धरला. यात नुकत्याच नव्याने उदयास आलेल्या व कामगार क्षेत्राची जाण नसलेल्या हाजीरा येथिल एक युनियन व मुंबईतील एका युनियनचा समावेश आहे. कर्मचारी संघटनेने या मागणीला कडाडून विरोध केला. यापूर्वी झालेल्या पाच निवडणूकांमध्ये सर्व ठिकाणचे मतदान एकत्रितरीत्या मोजले जात होते व त्यामध्ये मुंबई, उरण, हाजीरा असा भेदभाव नव्हता. उरण व हाजीरा या ठिकाणच्या मतपेट्यांची मतमोजणी वेगळी करु नये या मागणीसाठी आज झालेल्या मिटींगच्या इतिवृत्तावर (minutes) आपल्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सह्या करण्याचे नाकारले. ओएनजीसी मुंबई विभागाचे मुंबई, उरण व हाजीरा असे विभाग करण्यासाठी जेसीएमचा निर्णय होणे आवश्यक आहे हे आम्ही डेप्युटी चिफ लेबर कमिशनरच्या निदर्शनास आणून दिले. स्वतःचा वैयक्तिक स्वार्थासाठी काही नेते मंडळी आपल्या आस्थापनेचे छोटे छोटे विभाग करण्याचा प्रयत्न करीत असतील व ओएनजीसी विशिष्ठ दडपणाखाली कर्मचारी संघटनेला डावलून नको ते निर्णय घेत असेल तर कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब कर्मचारी संघटने तर्फे केला जाईल.

याबाबतीत जी काही पुढिल कारवाई करण्यात येईल ती आपणास कळविणयात येईल. तसेच आज झालेल्या मतमोजणीच्या निर्णयाव्यतिरीक्त दि. १४ जून ते २८ जून २०१८ या कालावधीत मान्यताप्राप्तीसाठी होत असलेल्या गुप्त मतदान प्रक्रियेमध्ये आपण सर्वांनी जाणिवपूर्वक सहभागी होवून कर्मचारी संघटनेस भरघोस मतांनी विजयी कराल असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.

धन्यवाद.

कामगार एकता झिंदाबाद ! कर्मचारी संघटना झिंदाबाद !!

आपला नम्र,

दि. १७/०५/२०१८

**(प्रदीप मयेकर)**
**सरचिटणीस**